**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १२१४/२०२२**
**सरकार वि. मथु कडाळे**
**निशाणी क्र. ११ लगत**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु</u>**

| | | |
|---|---|---|
| **नांव** | – | बाळासाहेब सुर्यभान नवले |
| **वय** | – | ५० वर्षे |
| **व्यवसाय** | – | शेती |
| **राहणार** | – | झोळे, ता. संगमनेर, जि. अ. नगर |
| **मो. क्रं.** | – | ९९२१३४७०४४ |

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विधीज्ञ श्रीमती पी. एस. रोहमारे यांचेमार्फत</u>**

दिनांक १५/०९/२०२२ रोजी मला पोलीसांनी राज्य उत्पादन शुल्क, संगमनेर यांच्या कार्यालयात पंचनाम्यावर सही करण्याकरीता बोलावले होते. पंचनामा कशाबाबत होता हे मला माहित नाही. त्या ठिकाणी पोलीसांनी माझी एका कागदावर सही घेतली. त्यातील मजकूर मला माहित नाही. आता साक्षीदारास घटनास्थळ/जप्ती पंचनामा दाखविण्यात आला असता त्यावरील त्याची सही ओळखली असून त्यातील मजकूर त्याला माहित नसल्याचे कथन केले आहे. तरी त्यास सहीपुरती **<u>नि. क्र. १७</u>** देण्यात येते.

**(साक्षीदार हा सरकारी पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तरसुचक स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली – परवानगी देण्यात आली.)**

२. आता साक्षीदारास घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखवण्यात आला. त्याने ते माहित नसल्याचे कथन केले आहे. पोलिसांनी तसे का नमुद केले आहे याचे कारण माहित नसल्याचे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी व त्यांचे विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. अभिलेखावर कोणताही अर्ज सादर केला नाही. सबब, आरोपीविरुध्द उक्त साक्षीदाराचा**

**उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

**फेरतपास नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

Sd/-

दिनांक : ०४/१२/२०२५ **(सुनिल ल. येलदी)**

ठिकाण: संगमनेर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्यायालय क्र.०५), संगमनेर